**जिल्हा निवड समिती औरंगाबाद**

**जिल्हा परिषद, औरंगाबाद अंतर्गत गट-क मधील सरळसेवेतील अनुसूचित जमातीची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात**

**जाहिरात क्रमांक:- ०१/२०१९ दिनांक :- २७/१२/२०१९**

**-------------------------------**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दिनांक २१ डिसेंबर २०१९ अन्वये दिलेल्या सुचने नुसार अनुसूचित जमातीच्या प्रवर्गाची पदे अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांमधून विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून पदे भरण्याची कार्यवाही करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. ग्राम विकास विभागाचे शासन निर्णय क्रं. संकीर्ण २०१८/प्र.क्र.२२६/भाग-२/आस्था-८ दिनांक २४ डिसेंबर २०१९ अन्वये अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची भरती करतांना धोरणात्मक निर्णय घेण्यात आला असुन जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२१६/(प्र. क्र.६५/ १६)/ १३-अ दिनांक १३ जुन २०१८ अन्वये विहित तरतुदी (ऑनलाईन परीक्षेशी संबंधित मुद्दे वगळता) त्या शासन निर्णयातील सर्व धोरणात्मक निर्णय व कार्यपध्दती जशीच्या तशी या भरती प्रक्रियेसाठी लागू करण्यात आले आहे. दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा परिषद **औरंगाबाद** अंतर्गत शिक्षण विभागाकडील सरळसेवेने भरावयाच्या अनुसूचित जमातीच्या प्राथमिक शिक्षण सेवक पदांचे भरती करीता सोबतचे विहित नमुण्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. खाली नमुद केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे विहित अर्हताधारक पात्र उमेदवारांनी आपले अर्ज जिल्हा परिषद कार्यालयास सादर करावेत.

पदभरतीसाठी पदनिहाय सामाजिक आरक्षण व समांतर आरक्षणाचे तपशिल खालील विवरणपत्रात नमूद केलेप्रमाणे आहेत.

➢ **अर्ज करण्याची पध्दत**

| | |
|---|---|
| १ | प्रस्तुत परीक्षे करीता विहित नमुन्यात आवश्यक सर्व कागदपत्रासह अर्ज सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद औरंगाबाद कार्यालयात स्विकारण्यात येतील. तसेच टपालाव्दारे पाठविलेल्या व मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांचाही स्विकार करण्यात येईल. |
| २ | पात्र उमेदवारांना विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह विहित कालावधीतच करणे आवश्यक राहिल. |
| ३ | सदर अर्जासोबत परीक्षा शुल्क राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट सोबत जोडणे आवश्यक राहील. डिमांड ड्राफ्ट जोडण्यात न आलेले अर्जांचा विचार केला जाणार नाही. |
| ३ | अर्ज स्विकारण्याचा कालावधी - २८/१२/२०१९ ते ०६.०१.२०२० या कालावधीत कार्यालयीन वेळेत |

➢ **शुल्क**

| | |
|---|---|
| १ | अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांसाठी परीक्षा शुल्क रु.१५०/- |
| २ | माजी सैनिक उमेदवारांसाठी परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. |
| ३ | शुल्क म्हणुन राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट "मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद" (Chief Executive Officer Z.P. Aurangaabad) यांचे नांवे काढलेला असावा. डिमांड ड्राफ्टचे मागील बाजुस उमेदवाराचे नांव व पदाचे नांव टाकलेले असावे. |

➢ सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहिरात www.aurangabadzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी जाहिरातीत नमुद संपुर्ण माहिती काळजीपुर्वक वाचून विहित नमुण्यातील आपले अर्ज सदर करावेत. सदर संकेतस्थळाला भरतीप्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेसंबंधी आवश्यक अद्यावत माहिती प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, परीक्षेचा प्रकार,(समांतर आरक्षणात अंशत:/पुर्णतः बदल करणे, संवर्गनिहाय एकूण रिक्त पदांच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिया संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी तसेच नियुक्ती प्राधिकरण तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद औरंगाबाद यांना असतील.

➢ **जिल्हा परिषद औरंगाबाद अंतर्गत अनुसूचित जमातीचे रिक्त पदांची सरळसेवा भरती २०१९ अन्वये भरावयाच्या पदांची नावे, रिक्त पद संख्या, समांतर आरक्षणानुसार पदांचा एकत्रित तपशिल खालील प्रमाणे आहे.**

| अ. क्र. | पदाचे नांव | अनुसूचित जमातीच्या एकुण रिक्त पदांची संख्या | सर्व साधारण | समांतर आरक्षण | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | महिला | खेळाडु | माजी सैनिक | प्रकल्प-ग्रस्त | अंश-कालीन |
| १ | प्राथमिक शिक्षण सेवक (मराठी माध्यम) | २२ | ८ | ७ | १ | ३ | १ | २ |

**टिप :-** **१)** समांतर आरक्षणांतर्गत राखीव दर्शविलेल्या प्रवर्गाचे (माजी सैनिक यांचेसाठी राखीव पदे वगळुन) पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच सामाजिक प्रवर्गातील उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

२) प्राथमिक शिक्षकांची पदभरती ऑफलाईन पध्दतीने करण्यात येईल.

३) पदभरती करतांना शिक्षकांची अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी (TAIT) मधील गुणांचा विचार करुन प्राप्त झालेल्या अर्जदारांची गुणवत्ता यादी तयार करुन गुणानुक्रमाच्या क्रमवारीनुसार ज्या उमेदवारांचे गुण जास्त आहेत अशाच उमेदवारांची गुणवत्तेनुसार पदभरती करण्यात येईल.

वरील कोष्टकात नमुद पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुषंगिक बाबींचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**परिशिष्ठ-अ**

आवश्यक शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता व अनुभव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | प्राथमिक शिक्षण सेवक (मराठी माध्यम) | एकत्रीत मानधन रुपये ६०००/- | महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ च्या परिशिष्ट-४ भाग-२ (नियम-५) नुसार, शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे शा.नि.दि. ०७/०२/२०१९, शुध्दीपत्रक दि.२५/०२/२०१९, दि.१६/०५/२०१९ व दि.१२/०६/२०१९ नुसार इयत्ता १ ते ५ वी साठी शैक्षणिक व व्यावसायीक अर्हता- उच्च माध्यकिक उत्तीर्ण (४० टक्के गुणासह) व व्यावसायीक अर्हता D.ED/D.EL.ED /D.T.ED(Special Education)/TCH आणि TET Paper- १ or TET Paper-२ or CTET Paper-१ or CTET Paper-२ PASS तसेच अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी (TAIT) परिक्षेत किमान गुण प्राप्त केलेले असावेत. | |

➢ **वरील सर्व पदांसाठी आवश्यक सामाईक अर्हता खालील प्रमाणे असेल.**

| अ.क्र. | सामाईक अर्हता | तपशिल |
|---|---|---|
| १) | संगणक अर्हता :- | सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९.०३.२००३ मधील तरतुदी नुसार (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या CCC किंवा O स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे कडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र यापैकी एक प्रमाणपत्र किंवा माहिती तंत्रज्ञान (साप्रवि) विभागाच्या शासन निर्णय क्रमांक मातंस२०१५/प्र.क्र.२७७/३९ दिनांक ४.२.२०१३ व शासन पुरकपत्र क्र. मातंस २०१२/प्र.क्र.२७०/३९ दिनांक ८.१.२०१८ मध्ये नमुद केल्यानुसार आवश्यक संगणक अर्हता विहित मुदतीत प्राप्त करणे बंधनकारक आहे. |
| २) | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र | महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम २००५ मधील तरतुदीनुसार शासकीय सेवेतील भरतीमध्ये विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्ज सादर करतांना तसेच नियुक्ती वेळेस हजर होतांना विवाहीत उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक राहील.<br>प्रतिज्ञापत्रात नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेच्या नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. |

**(२) निवडीची कार्यपध्दती**

ग्राम विकास विभाग महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१११९०/आस्था-१४ दिनांक २६.१२.२०१९ व २७.१२.२०१९ मधील सुचने नुसार

१) निवड प्रक्रिया ऑफलाईन पध्दतीने करण्यात येईल.

२) निवड प्रक्रिया राबवितांना कोणत्याही प्रकारची परिक्षा घेण्यात येणार नाही.

३) पदभरती करतांना शिक्षकांची अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी (टिएआयटि) मधील गुणांचा विचार करुन प्राप्त झालेल्या अर्जदारांची गुणवत्ता यादी तयार करुन गुणानुक्रमाच्या क्रमवारीनुसार ज्या उमेदवाराचे गुण जास्त आहेत, अशाच उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

**(३) निवड सुची व तीची कालमर्यादा**

निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी विधीग्राहय राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

**(४) समान गुण असल्यास अनुसरावयाची कार्यपध्दती**

साप्रवि शासन पूरकपत्र क्रमांकःप्रानिमं-१२१७/(प्र.क्रं.९२/१७)/१३-अ दिनांक ०२ डिसेंबर,२०१७ व सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं१२१६/(प्र.क्रं.६५/१६)/१३-अ दिनांक १३ जून,२०१८ अन्वये परिक्षेचा निकाल तयार करतांना परिक्षेत ज्या पात्र उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढील प्रमाणे निश्चित करण्यात येईल.

| |
|---|
| अ)आत्महत्याग्रस्त शेतक-याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील. |
| **ब)** वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. |
| **क)** समान वय असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतम शैक्षणीक अर्हता (पदयुत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल) |
| **ड)** वरील प्रमाणे दोन्ही अटी समान ठरत असल्यास उमेदवाराच्या बाबतीत, सदर पदाकरीता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल. |

**(५) सर्वसाधारण सुचना**

उमेदवारांनी पदभरती करीता अर्ज सादर करीत असतांना शैक्षणिक पात्रता, अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र, जातीचे वैधता प्रमाणपत्र, संगणक प्रमाणपत्र व्यावसायिक पात्रतेचे प्रमाणपत्र, इ प्रमाणपत्राच्या छायाप्रती सादर करणे आवश्यक राहिल. कागदपत्र पडताळणीच्या प्रक्रिये वेळी पदाकरीता आवश्यक मुळ कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल.

| सर्वसाधारण अटी व शर्ती | शेरा |
|---|---|
| अ) उमेदवार भारताचा नागरीक असावा | |
| ब) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा | डोमीसाईल प्रमाणपत्र आवश्यक |
| क) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रं. मकसी१००७/प्र.क्र.३६/का.३६ दिनांक १० जुलै २००८ अन्वये महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या ८६५ गांवातील मराठी भाषिक उमेदवारांना वरील पदासाठी अर्ज करता येईल. | सदर उमेदवारांनी ८६५ गावांतील १५ वर्षाचे वास्तव्य असलेल्या रहिवाशी असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुण्यातील दाखला अर्जासोबत तसेच कागदपत्र तपासणीचे वेळी सादर करणे अनिवार्य राहिल. |

**(६) वयोमर्यादा**

**अ)**

I) उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास अर्ज केलेल्या पदाकरीता विहित वयोमर्यादा आणि आवश्यक किमान शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक राहिल.

II)अर्ज सादर करण्याचे अंतिम दिनांकास उमेदवारांचे वय १८ पेक्षा कमी नसावे.

III)अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकास उमेदवारांचे वय ४३ वर्ष पेक्षा जास्त नसावे.

**ब) सामाजिक व समांतर आरक्षणानुसार विहित वयोमर्यादेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | आरक्षण/समांतर आरक्षण | शसन निर्णयानुसार आरक्षणाकरिता कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | मागासवर्गीय उमेदवार | ४३ वर्षे |
| २ | दिव्यांग उमेदवार | ४५ वर्षे |
| ३ | प्रकल्पग्रस्त | |
| ४ | भुकंपग्रस्त | |
| ५ | सन १९९१ च्या जनगणना/सन १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी | |
| ६ | स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशीत पाल्य | |
| ७ | शासकीय कर्मचारी/ जिल्हा परिषद नियमीत कर्मचारी/ (नियुक्ती प्राधिकारी/ सक्षम प्राधिकारी यांची परवानगी आवश्यक राहील. | |
| ८ | अंशकालीन कर्मचारी | ५५ वर्षे |
| ९ | उच्च गुणवत्ता धारक खेळाडु उमेदवार | सर्व प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४३ वर्षे |
| १० | माजी सैनिक | सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६ अ दि. २० ऑगस्ट २०१० अन्वये उमेदवारांच्या सशस्त्र दलांत झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्षे इतका राहील तसेच दिव्यांग, माजी सैनिकासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील. |

**या शिवाय विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.**

| **(७) विशेष सुचना** | | |
|---|---|---|
| १) | महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अनिया/१००५/१२६ सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ नुसार दि.०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना समाप्त करुन शासनाने नव्याने दिनांक ०१.०४.२०१५ पासून लागू केलेली राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू राहील. मात्र सद्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९७४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही. | |
| २) | माजी सैनिकासाठी असलेल्या पदांवर शिफारशीसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यांच्यासाठी आरक्षीत असलेली पदे भरती संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश, परिपत्रक, शासन निर्णय यानुसार कार्यवाही करण्यात येईल. | |
| ३) | खेळाडू/महिला/प्रकल्पग्रस्त/भंकुपग्रस्त/अनाथ/पदवीधर अंशकालीन उमेदवार या समांतर आरक्षणाचे प्रवर्गातुन पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदांसाठी त्या त्या सामाजिक प्रवर्गातुन सर्वसाधारण (समांतर आरक्षण विरहीत) पात्र उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार विचार होवू शकेल. | |
| ४) | निवड झालेल्या उमेदवारांना प्रशासकिय सोय विचारात घेऊन उपलब्ध असलेल्या रिक्त पदी प्रथम पदस्थापना देण्यात येईल. उमेदवारांनी पदस्थापनेबाबत कोणत्याही प्रकारे सक्षम प्राधिकाऱ्यांवर दबाव आणल्यास त्यांचे नाव निवड यादीतून कमी करण्यात येईल. | |
| ५) | कागदपत्र तपासणी करीता लेखी सुचना टपालाने पाठविण्यात येईल तसेच अर्जातील नमुद ईमेल आयडी (Email ID) वरही पाठविण्यात येईल. पदभरती संबंधी सुचना संकेत स्थळावरून उपलब्ध करण्यात येणार असुन उमेदवारांनी सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेची माहिती कार्यक्रमाबाबत अद्यावत राहण्याची व जिल्हा परिषद कार्यालयाशी संपर्क करुन आवश्यक माहिती उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. | |

| | | |
|---|---|---|
| ६) | सदर पदभरतीचे नियम/निकषामध्ये पदभरती पुर्ण होईपर्यंत वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या शासन निर्णय/परीपत्रक/अधिसुचना यानुसार बदल होवू शकतो. | |
| **(८) सामाजिक व समांतर आरक्षणाचे अनुषंगाने महत्वाच्या सुचना** | | |
| | **१)महिला आरक्षण**<br>अ) महिला व बालकल्याण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक ८२/२००१/म.से.आ-२०००/प्र.क्र. ४१५/ का.२, दि.२५.०५.२००१ मधील तरतदीनुसार महिलांसाठी आरक्षण राहील. ज्या महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असेल त्यांनी तशी मागणी ऑनलाईन अर्जात करणे अनिवार्य आहे.<br>ब) महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या महिला उमेदवारांनी महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक ८२/ २००१/ मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का.२, दिनांक २५.५.२००१ तसेच शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग , क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६//१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट २०१४ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१७/ प्र.क्र.१९१/१७/कार्या-२/दिनांक १५.१२.२०१७ नुसार शासनाने प्रस्तावित केलेले उन्नत व प्रगत गटात (क्रिमिलेअर ) मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-यांनी दिलेले अलिकडचे / नवीनतम मुळ नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Latest Non Creamy Layer Certificate ) कागदपत्र छाननीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. तसेच महिला आरक्षणाच्या उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची तपासणी विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास विभाग यांचेमार्फत करणे आवश्यक राहील. | |
| | **२) अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडू**<br>- शासन निर्णय शालेय व शिक्षण विभाग विभागाचे शासन निर्णय दि.०१ जुलै,२०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१ ऑक्टोबर २०१७ आणि तद्नंतर शासनाने या सदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार, प्राविण्य प्राप्त खेळाडूंबाबत आरक्षण, क्रिडा विषयक प्रमाणपत्र पडताळणी वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.<br>- प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत :- खेळाडू उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वी सुधारित तरतुदी नुसार विभागीय उप संचालक यांचेकडुन खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे गुणवत्ता खेळाडू उमेदवारांना कागदपत्र पडताळणीच्या वेळी विभागिय उपसंचालक यांनी क्रिडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो या बाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडू साठी आरक्षित पदावर शिफारशीसाठी / नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल.<br>- तसेच आरक्षणासाठी क्रिमिलेअरची अट लागू राहणार नाही.<br>- शासन शुध्दीपत्रक क्रमांक राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२ दिनांक १८.०८.२०१६ मध्ये दिलेल्या तरतुदी नुसार भरती वर्षात त्या-त्या प्रवर्गातील खेळाडू उमेदवार उपलब्ध झाले नाही तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या प्रवर्गातील बिगर खेळाडू उमेदवारांमार्फत भरण्याची कार्यवाही करण्यात येईल. | |
| | **३)माजी सैनिक**<br>शासन परिपत्र साप्रवि क्र. आरटीए१०७९/४८२/१६-अ दिनांक १६.०४.१९८१ अन्वये माजी सैनिक उमेदवारांना समांतर आरक्षण लागु करण्यात आले आहे. माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत सैन्यात काम केल्या बाबतचे आवश्यक कागदपत्र व जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केले असल्या बाबत प्रमाणपत्र व सेवा तपशील दर्शविणारे अभिलेख प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्यांकडून पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यात येणार नाही. तसेच सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.आरटीए ९०९०/६२/प्र.क्र. २२२/९१/२८ मुंबई दि. ३० डिसेंबर १९९१ अन्वये माजी सैनिकांना शासन सेवेत नागरी सेवेतील पदावर नियुक्तीसाठी देण्यात येणाऱ्या सवलतीचा त्यांनी एकदा फायदा घेतल्यावर नागरी सेवेतील पदावर नेमणुकीसाठी दुसऱ्यांदा तसा फायदा घेता येणार नाही.<br>सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दिनांक ०२.०९.१९८३ नुसार माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये युध्द काळात व युध्द नसतांना सैनिक सेवेत मृत्यू झालेल्या किंवा अपंगत्व येवून त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुंटूंबातील फक्त एका व्यक्तिला नियुक्ती देणेचे धोरण आहे व त्यांचा १५ टक्के समांतर आरक्षणातुन विचार करणेत येईल. | |
| | **४)अंशकालीन कर्मचारी**<br>शासन निर्णय दि. २७ ऑक्टोंबर २००९ अन्वये पदविधर/पदविकाधारक अंशकालीन या समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी सुशिक्षीत बेरोजगार या योजने अंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षे काम केल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये सदर अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे व तशी नोंद ऑनलाईन अर्जात नमुद करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारांना कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. अंशकालीन उमेदवाराने एकदा समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्याच उमेदवारांस पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही, तसे आढळल्यास कोणत्याही वेळी निवड रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी. | |
| | **५) प्रकल्पग्रस्त**<br>शासन निर्णय साप्रवि क्र. एईएम१०८०/३५/१६अ दिनांक २१.०१.१९८० नुसार प्रकल्पग्रस्तांसाठी समांतर आरक्षण लागु करण्यात आलेले आहे. प्रकल्पग्रस्त या समांतर आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांनी संबंधित जिल्हयातील मा. जिल्हाधिकारी/ जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याकडील प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची मुळ प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. | |
| **(९) इतर सर्वसाधारण सुचना** | | |
| | १)ज्या उमेदवारांनी यापुर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे, सेवा योजन कार्यालय, समाजकल्याण, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयात नांवे नोंदविली असली तरी अशा उमेदवारांना विहीत मुदतीत स्वतंत्ररित्या विहित नमुण्यातील अर्ज जिल्हा परिषदेकडे सादर करणे व शुल्क डिमांड ड्राफ्ट सोबत जोडणे आवश्यक राहील (माजी सैनिकांना शुल्क भरणे आवश्यक नाही) तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन अशा इच्छुक व पात्र उमेदवारांनी देखील अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारांत घेतले जाणार नाहीत. अशा उमेदवारांना कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही. | |
| | २)अनुभवाच्या बाबतीत मासिक, नियतकालीक, अंशकालीक, विद्यावेतन, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेला अंशकालीन सेवेचा कालावधीत सेवेत प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही. | |
| | ३)शासकीय /निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या संबंधित नियुक्ती प्राधिकरणाच्या परवानगीने भरावयाचा आहे. अशी परवानगी प्राप्त केल्याची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. | |

| | | |
|---|---|---|
| | ४)जिल्हा परिषदेकडे अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास किंवा खोटी माहिती पुरविल्यास अथवा एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल. | |
| | **५)** निवड प्रक्रिया सुरू झाल्या नंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवारानी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती बाद करण्यात येईल, व शासनाची दिशाभुल केल्या प्रकरणी सदर उमेदवारा विरूध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. | |
| | ६)चारित्र्य-पुर्वचारित्र्य पडताळणी अंती अक्षेपार्ह बाबी आढळून असल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी/सेवेसाठी पात्र राहाणार नाही. तसेच कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील. | |
| | ७)निवड झालेल्या उमेदवारांनी आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्र/हमीपत्र इत्यादींची पुर्तता करून देणे आवश्यक राहील. तसेच त्या प्रमाणपत्रांची पडताळणी विहित पध्दतीनुसार करून घेणे बंधनकारक राहील. सेवेत नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना नियमानुसार आवश्यक ती सेवाप्रवेशोत्तर परीक्षा/प्रशिक्षण विहित मुदतीत उत्तीर्ण/पुर्ण करणे आवश्यक राहील. | |
| | ८)अपरिहार्य कारणास्तव किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा शासन आदेशाने विहित दिनांकास मुळ कागदपत्रांची तपासणी करणे शक्य नसेल तर जिल्हा निवड समिती ठरवून देईल त्या प्रमाणे सोईच्या दिवशी कागदपत्रांची तपासणी करण्यात येईल. | |
| | ९) मुळ कागदपत्र पडताळणीस उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. | |
| | १०)निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल. वैद्यकीय अहवाल प्रतिकुल असल्यास केलेली निवड व नेमणुक रद्य करण्यात येईल. | |
| | ११)वरील अटी व शर्ती नियमाव्यतिरिक्त शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व निर्णय लागू राहील. | |
| | १२)जाहिराती मधील काही मुद्दे शासन निणर्याच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहील. | |
| | १३)समानगुण आणि आत्महत्याग्रस्त शेतक-याचे पाल्य :- उमेदवारांना समान गुण मिळाल्यास उमेदवारांची गुणवत्ता यादीतील प्राधान्यक्रम सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक प्रनिमं-१२१६/प्र.क्र.६५/१६/१३-अ, दिनांक १३ जून, २०१८ मधील तरतुदीनुसार निश्‍चित करणेत येईल. यामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकाऱ्यांच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील. | |
| | १४)शासन सामान्य प्रशासन विभाग पुरकपत्र क्र.प्रानिमं-२०१७/(प्र.क्र.९२/१७)/१३-अ, दिनांक ५.१०.२०१५ मधिल तरतुदी नुसार परीक्षमध्ये समान गुण मिळालेल्या उमेदवरांचा गुणवत्ता यादीत समावेश करतांना आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या पाल्यास प्रथम प्राधान्य देण्याचा शासनाच्या धारणानुसार अशा उमेदवारांकडे अर्ज करतेवेळी संबंधित जिल्हास्तरीय समितीने त्यास कुटूंबातील मृत शेतक-याचा पाल्य म्हणुन पात्र ठरविण्या बाबतचा पुरावा सांक्षाकित प्रतिसह अर्ज सादर करतेवेळी तसेच कागदपत्र छाननीच्या वेळी समितीस उमेदवाराने उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. | |
| | १५)भरती प्रक्रिया / कागदपत्र तपासणी स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशतः बदल करणे पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी व नियुक्ती प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद यांना राहतील. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही किंवा वाद उपस्थित करता येणार नाही. | |

**स्वाक्षरीत**
**सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती**
**तथा अति.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, औरंगाबाद**

**स्वाक्षरीत**
**सदस्य, जिल्हा निवड समिती**
**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, औरंगाबाद**

**स्वाक्षरीत**
**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती**
**तथा जिल्हाधिकारी, औरंगाबाद**

**जिल्हा परिषद औरंगाबाद अनुसूचित जमाती करीता राखीव पदांची भरती सन २०१९**
**अर्जाचा नमुना**

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक

TAIT परीक्षे मधील गुण

**उमेदवाराने या ठिकाणी पासपोर्ट साईझ फोटो स्व-साक्षांकित करुन चिटकवावा**

प्रति,
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी**
जिल्हा परिषद औरंगाबाद

विषय :- प्राथमिक शिक्षण सेवक (मराठी माध्यम) पदासाठी अर्ज

१. संपूर्ण नांव : .......................... .......................... ............................................
(नांव) (वडीलांचे/पतीचे नांव) (आडनांव)

(इंग्रजी मध्ये) : .......................... .......................... ............................................
(नांव) (वडीलांचे/पतीचे नांव) (आडनांव)

२. पत्रव्यवहाराचा पत्ता :

.........................................................................................................................

घर क्रमांक ............... शहर/गांव .......................... वार्ड क्रं................

पोस्ट .......................... तालुका .......................... जिल्हा ....................

पिनकोड ........................................ मो.नं. ..............................................

ईमेल आयडी (Email ID) - आधार क्रमांक -

३. अर्जदार स्त्री आहे किंवा पुरुष -

४. अर्जदार अनुसूचित जमाती राखीव प्रवर्गासाठी अर्ज सादर असल्याने जातीचा तपशिल :-

५. अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक :-

६. अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देणारे कार्यालय :-

७. अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक :-

८. अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र तपासणी समितीचे नांव :-

९. अर्जदार समांतर आरक्षणातील राखीव पदांसाठी अर्ज करीत असल्यास खालील लागु असलेल्या प्रवर्गाचा क्रमांक चौकोनात लिहावा -

| महिला | माजी सैनिक | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | खेळाडु | अंशकालीन पदविधर | अल्पदृष्टी (लो-व्हीजन) | कर्ण-बधीर | अस्थि-व्यंग | अनाथ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |

७. अर्जदाराची जन्मतारीख : अंकामध्ये (शालांत प्रमाणपत्रानुसार)

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

८. दिनांक ०६.१.२०२० रोजीचे वय

| वर्ष | महिना | दिवस |
|---|---|---|
| | | |

९. अर्जदार अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी परीक्षा TAIT पात्र आहे काय ? होय/नाही

| अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी परीक्षा (TAIT) आसन क्रमांक | उत्तीर्ण वर्ष | प्राप्त गुण |
|---|---|---|
| | | |

१०. अर्जदार TET परीक्षा पात्र आहे काय ? होय/नाही

| पेपर क्रमांक | शिक्षक पात्रता परीक्षा (TET) आसन क्रमांक | उत्तीर्ण वर्ष | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |

११. अर्जदार CTET परीक्षा पात्र आहे काय ? होय/नाही

| पेपर क्रमांक | शिक्षक पात्रता परीक्षा (CTET) आसन क्रमांक | उत्तीर्ण वर्ष | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |

१२ अर्जदाराची शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झालेल्या परीक्षेचा तपशील.)

| शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | परीक्षा मंडळाचे/ विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | मिळालेले एकुण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१३. राष्ट्रीयत्व : भारतीय/अभारतीय

१४. महाराष्ट्रचा मुळ रहिवासी आहे काय? होय/नाही

१५. कर्नाटक ८६५ गावातील रहिवासी आहे काय होय/नाही

१६. अर्जदाराने नोकरीसाठी सेवायोजन कार्यालयाकडे नांव नोंदणी केली आहे काय? होय/नाही
- असल्यास नोंदणी कार्यालयाचे नांव ..........................................................................................
नोंदणी क्रमांक ................................ दिनांक ............................

१७. सोबत जोडलेल्या डिमांड ड्राफ्टचा तपशिल - रुपये (            ) दिनांक   /   /
राष्ट्रीयकृत बँकेचे नांव - ........................................................................

१८. अनुभव असल्यास सविस्तर तपशिल खालील तक्त्यात नमुद करावा.(प्रमाणपत्र सोबत जोडावे)

| काम केलेल्या संस्थेचा/ कार्यालयाचा तपशिल | कालावधी | पद व अनुभवा बाबत सविस्तर तपशिल |
|---|---|---|
| | | |
| | | |

**अर्जासोबत खालील सांक्षंकीत प्रती सोबत जोडाव्यात व त्यासमोर ( √ ) खुण करावी**

| | | |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जमातीचे सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र | ( ) |
| २. | अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र | ( ) |
| ३. | शैक्षणिक पात्रतेच्या प्रमाणपत्रांच्या प्रती गुणपत्रिकेसह | ( ) |
| ४. | TAIT परीक्षेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र | ( ) |
| ५. | शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) गुणपत्रक व प्रमाणपत्र | ( ) |
| ६. | डि.एड / डिएलएड गुणपत्रक व प्रमाणपत्र | ( ) |
| ७. | महाराष्ट्राचा मुळ रहिवासी/कर्नाटक ८६५ गावातील रहिवासी प्रमाणपत्र | ( ) |
| ८. | माजीसैनिक/अपंग उमेदवारांनी सक्षम प्राधिका-याचा दाखला | ( ) |
| ९. | समांतर आरक्षणातुन अर्ज असल्यास सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र | ( ) |
| १०. | जन्म दिनांकासाठी एस.एस.सी. प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला | ( ) |
| ११ | उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र | ( ) |
| १२. | कुटुंब मर्यादा प्रमाणपत्र | ( ) |
| १३. | अनुभव प्रमाणपत्र | ( ) |
| १४. | नावात बदल बाबत राजपत्र | ( ) |

वर नमुद केलेला तपशिल माझे माहिती प्रमाणे खरा आणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता माझेपाशी आहे याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे. मी आणखी असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास नोकरी गमावण्यास व अनुषंगाने होणा-या इतर कार्यवाहीस पात्र व बांधील राहील व त्याबद्दलची माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण .......................... अर्जदाराची स्वाक्षरी
दिनांक / / नांव ................................................................

................................. ० ० ० .................................

**प्रतिज्ञापत्र**

म.ना.से.(लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील नमुना अ

**(नियम ४ पहा)**

मी श्री/श्रीमती/कुमारी .................................................... श्री. ........................................................................

यांचा/यांची/मुलगा/ मुलगी /पत्नी वय .................. वर्षे, राहणार ................ या द्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी ......................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ............... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. यापैकी दि.२८ मार्च २००५ या नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ...................... आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अपात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण .......................... अर्जदाराची स्वाक्षरी
दिनांक / / नांव ................................................................